**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राज गोपाल झंवर
७२२, गुरूवार पेठ, पुणे-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक,
हवेली नं.१, मामलेदार कचेरी, शुक्रवार पेठ,
पुणे-४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,<br>मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे-४११ ००१<br>श्री. व्ही. डी. धनशेट्टी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक,<br>हवेली नं.१, मामलेदार कचेरी, शुक्रवार पेठ,<br>पुणे-४११ ००२ श्री. एम. एस. कदम | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.६.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राज गोपाल झंवर यांनी सन १९७१ मधील दस्तऐवजांच्या नकला मागितल्या होत्या. संबंधित दस्त उपलब्ध नसल्याचे व शोध घेत असल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. त्यानुसार शोध घेता दस्ताच्या प्रमाणित प्रती अभिलेख कक्षात प्राप्त झाल्या आहेत, तसे अपीलकर्त्यास कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तथा सह दुय्यम निबंधक, हवेली नं.१ श्री. एम.एस. कदम व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री. व्ही.डी. धनशेट्टी यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर नामदेव कड
मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपअभियंता(बांधकाम),
जिल्हा परिषद उपविभाग खेड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, खेड, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर नामदेव कड
मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपअभियंता(बांधकाम),
जिल्हा परिषद उपविभाग खेड, पुणे श्री.एस.डी.मुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, खेड, ता.खेड, जि.पुणे श्री.बी.एन.लांडेकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

स्मशानभूमी बांधण्याच्या संदर्भातील माहिती दिली नाही, तसेच त्या संदर्भातील ठरावाची प्रत दिली नाही. अपूर्ण, चुकीची, दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शंकर नामदेव कड यांनी केली.

अपीलकर्त्यांनी विचारलेल्या मुद्दयांची उत्तरे व माहिती देण्यात आली. परंतु स्मशानभूमी बांधलेल्या गटामधील क्षेत्राबाबत पंचनामा करून माहिती द्यावी. नापिक झालेल्या शेतजमिनीची नुकसानभरपाई मिळावी व पूर्वीप्रमाणे शेतजमीन तयार करून द्यावी, अशा मागण्या श्री.कड यांनी केल्या आहेत. त्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्यामुळे त्यावर उत्तर दिले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, खेड, पुणे श्री.बी.एन.लांडेकर यांनी नमूद केले.

ग्रामपंचायतीने स्मशानभूमी बांधकामास दिलेल्या ना हरकत दाखल्याची प्रत व दाव्याबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने

सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्यांच्या अन्य मागण्या (मुद्दा क्र.४,६,७,८,९ ) प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार 'माहिती'च्या संज्ञेत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गंगाधर भिमजी पाटील
मु.पो.मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, मनवाड, विकास कार्यकारी
सहकारी (विकास)सेवा संस्था मर्या.मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८ / कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गंगाधर भिमजी पाटील
मु.पो.मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.एल.टी.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, मनवाड, विकास कार्यकारी
सहकारी (विकास)सेवा संस्था मर्या.मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.१२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.९.१.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.-- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

द मनवाड विकास सेवा सहकारी संस्था मर्यादित, मनवाड या संस्थेच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी व संस्थेच्या सचिवांनीही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गंगाधर भिमजी पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांनी मागणी केलेली माहिती संस्थेच्या कक्षेतील होती. त्यानुसार संस्थेला कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी संस्थेचे सचिव उपस्थित होते व सात दिवसांत माहिती देण्याचे त्यांनी मान्य केले. त्यानुसार माहिती दिली, असा अहवाल सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी सादर केला, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एल.टी.भोसले यांनी नमूद केले. आपल्याला सभासद करून घेतलेले नाही, ही अपीलकर्त्याची मुख्य तक्रार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड विविध कार्यकारी सहकारी(विकास) सेवा संस्था, मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी योग्य कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्यास माहिती दिल्याचा पुरावा त्यांनी सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा सचिव, मनवाड विविध कार्यकारी सहकारी(विकास) सेवा संस्था, मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांनी माहिती दिल्याचा अहवाल आयोगाला दि.२८.३.२०१० पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. मोहन श्रीपाद घाटपांडे
मु.पो.वेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विवाह निबंधक
कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विवाह अधिकारी,
विवाह निबंधक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विवाह निबंधक
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे
श्री. बी. डी. धनशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा विवाह अधिकारी,
विवाह निबंधक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे
श्री. एस. आर. कदम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.७.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मोहन श्रीपाद घाटपांडे यांनी सन १९७२, १९७३ व १९७४ मधील एका विवाहाच्या संदर्भातील माहिती मागितली होती. अभिलेखात ज्या बाबींची नोंद असते त्याची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असून सविस्तर उत्तर देण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विवाह अधिकारी, विवाह निबंधक कार्यालय, पुणे श्री. एस. आर. कदम व अपिलीय प्राधिकारी तथा विवाह निबंधक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. बी. डी. धनशेट्टी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर सखाराम घोलप
घोडेगाव, साईसदन, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घोडेगाव,
ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, आंबेगाव, जि.पुणे श्री.राहुल शांताराम काळभोर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घोडेगाव,
ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.सचिन तुकाराम उंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.६.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

फेरफार नोंद रद्द करण्याबाबतची माहिती व मागणी अपीलकर्ता यांनी केली होती. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.सचिन तुकाराम उंडे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, जि.पुणे श्री.राहुल शांताराम काळभोर यांनी केले. आपली तक्रार राहिली नसल्याचे लेखी निवेदन अपीलकर्त्याने आयोगास सादर केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२६.३.२०१०**

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टीज, हिराम लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दहीवडी (माण), जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा श्री.एच.पी.मुळुक

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दहीवडी (माण), जि.सातारा श्री.व्ही.पी.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दहीवडी (माण), जि.सातारा यांनी आपल्याला दिलेली माहिती अपूर्ण व अयोग्य असून अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनीही योग्य दखल घेतली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी व संपूर्ण माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी केली.

श्री.बावधनकर यांच्या दि.१२.५.२००८ च्या अर्जावर दि.२१.५.२००८ रोजी शुल्क कळविले. त्यांनी दि.२.६.२००८ रोजी शुल्क भरले. त्यानुसार दि.६.६.२००८ रोजी त्यांना माहिती देण्यात आली. सन २००५ मधील फेब्रुवारी, मार्च व एप्रिल या काळातील तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दहिवडी(माण), जि.सातारा श्रीमती नंदिनी घाणेकर यांच्या दैनंदिनीच्या प्रती दाखल झालेल्या नसल्यामुळे त्यांना देता आल्या नाहीत. तसेच जवाहर विहिर पात्र लाभार्थींची यादी देण्यात आली, अपात्र लाभार्थींची अशा स्वरूपाची यादी तयार केली जात नसल्यामुळे देता आली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा श्री.एच.पी.मुळुक यांनी केले. संबंधित कालावधीतील दैनंदिनी पंचायत समिती स्तरावर व जिल्हा पातळीवर प्राप्त करून घेण्याचा

प्रयत्न केला परंतु  त्या सादर झाल्याची जिल्हा परिषदेकडे नोंद नाही. तसेच तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांनी या कालावधीतील प्रवास भत्ता घेतलेला नाही, असेही त्यांनी नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२६.३.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कांताराम तात्याबा काळे
मु.पो. घोडेगांव, ता.आंबेगाव,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती आंबेगाव, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत काळेवाडी दरेकरवाडी,
ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३२/पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/४/२००८ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कांताराम तात्याबा काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने आयोगाच्या दि. २६/९/२००८ च्या पत्रान्वये त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि श्री.काळे यांनी आयोगास कोणतीही कागदपत्रे अद्याप सादर केलेली नाहीत. सबब श्री. काळे यांच्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे, संपादक — अपीलकर्ता
सा.कराभिमा टाईम्स, व्हील कॉलनी,
बारामती, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर)
पुणे विभाग, साखर संकुल, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर,
ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६१ + २२६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.३.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नामदेव शामराव नालंदे,
संपादक, सा.कराभिमा टाईम्स, व्हील कॉलनी, बारामती, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग,
साखर संकुल, पुणे श्री. डी. आर. घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर,
ता. बारामती, जि. पुणे श्री. शहाजी रामदास भगत

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २२६१/ पुणे | २६.४.२००८ | १७.५.२००८ | १२.६.२००८ | २३.१०.२००७ |
| २२६२/ पुणे | १०.५.२००८ | १७.५.२००८ | १२.६.२००८ | २३.१०.२००७ |
| ८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | | | | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता. बारामती यांनी पानांची संख्या आदी तपशील न देता मोघम स्वरूपाचे शुल्क आकारले. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, पुणे यांनी अपिलाची योग्य प्रकारे दखल न घेता जन माहिती अधिकाऱ्यांना पाठीशी घातले, त्यामुळे दोघांवरही कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. नामदेव शामराम नालंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स व आयोगाने दि. २३.३.२०१० रोजी घेतलेल्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते.

श्री. नालंदे हे पत्रकार असून वीस वर्षांतील आपली वैयक्तिक माहिती त्यांनी मागितली होती. कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही व आपल्याला रू. ५०००/- दिल्यास माहिती मागणीचा अर्ज मागे घेऊ, असे तोंडी कळविले. परंतु ते नाकारल्यामुळे त्यानी पुन्हा दुसरा अर्ज करून आपल्या संदर्भातील सात वर्षांची माहिती मागितली. त्याबाबत त्यांना शुल्क कळविले. त्यांनी शुल्क भरल्यास माहिती देण्यास आपली तयारी असतानाही त्यांनी शुल्क न भरता अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकूल, पुणे यांच्याकडे अपील केले. तेथे तीन तारखा देऊनही सुनावणीला हजर राहिले नाहीत. शुल्क भरून त्यांना माहिती प्राप्त करून घेण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, पुणे यांनी दिला. त्यानुसार कार्यवाही न

करता श्री. नांलदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. आपल्याला ब्लॅकमेल करून ते पैशाची मागणी करत असून ती पूर्ण होत नसल्यामुळे वकिलामार्फत नोटीस, पोलिस अधीक्षकांकडे तक्रार, तहसीलदार, साखर आयुक्त आदींकडे माहिती-मागणीचे अर्ज अशा विविध मार्गांनी ते आपल्याला त्रास देत आहेत. म्हणून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता. बारामती श्री. शहाजी रामदास भगत यांनी केले. तशा स्वरूपाचे लेखी निवेदन त्यांनी आयोगाला सादर केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले आहे, त्यांना माहिती नाकारलेली नाही. सुनावणीला दिलेल्या तीन तारखांना अपीलकर्ता गैरहजर राहिले. ते शुल्क भरून माहिती घेऊ शकतात. जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालण्याचा यात प्रश्न येत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, पुणे श्री. डी. आर. घोडे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता. बारामती श्री. शहाजी रामदास भगत यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले आहे. आवश्यक तर अपीलकर्त्याने त्यानुसार शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावयास हवी होती. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, पुणे यांनी तसा निर्णय दिला आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. जन माहिती अधिकारी श्री. शहाजी रामदास भगत यांच्या अपीलकर्ता यांच्यावरील आरोपांची सत्यासत्यता व अपीलकर्त्याविरूध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यासाठी परवानगीची त्यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेरील विषय आहे. मात्र त्यांनी नोंदविलेले आक्षेप गंभीर स्वरूपाचे असून श्री. शहाजी रामदास भगत यांना अपीलकर्त्यावरील आरोपाबाबत

कायदेशीर कारवाई करावयाची असल्यास त्याबाबतचा निर्णय ते स्वतः घेऊ शकतात. त्यास परवानगी देण्याचा प्रश्न येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.एकनाथ तुकाराम कांबळे
मु.पो.कुरूळी, ता.राजगुरूनगर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, राजगुरूनगर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुरूळी,
ता.राजगुरूनगर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुरूळी,
ता.राजगुरूनगर, जि.पुणे विद्यमान-श्री.एस.बी.भाकरे, तत्कालीन-श्री.एस.बी.धंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१२.२००८ व २४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. दि.२३.१२.२००८ रोजी तीनही घटकांपैकी कोणीही हजर न राहिल्यामुळे दि.२४.२.२००९ रोजी पुन्हा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या अर्जानुसार मिळालेल्या कागदपत्रांमुळे माहितीच्या अधिकारांतर्गत आपला फायदा व समाधान झाले आहे. कोणताही आक्षेप राहिलेला नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.एकनाथ तुकाराम कांबळे यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२६.३.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजयकुमार मोहनराव घाटगे
घोडेगांव, ता.आंबेगांव, जि.पुणे
खटकाळी, साल-वाडा रोड **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
डॉ. आबेंडकर रोड, पुणे विभाग, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
डॉ. आबेंडकर रोड, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०८/पुणे |
| २ | सुनावणीचा दिनांक | दि. ३०/३/२०१० |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५/७/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/८/२००८ |
| ५ | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी,**<br>शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,<br>श्री. व.मा.गायकवाड<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**<br>पुणे विभाग, डॉ. आबेंडकर रोड, पुणे<br>श्री. सुनिल मगर | |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली माहिती :-** शैक्षणिक वर्ष:२००६-०७ व २००७-०८ मध्ये शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून नियुक्त उमेदवारांना दिलेल्या मान्यता आदेशांच्या प्रती व नामावली बाबत. | |

## विवेचन

' जन माहिती अधिकारी यांनी मला सर्व माहिती उपलब्ध करुन दिली असून प्राप्त माहितीने माझे समाधान झाले असल्याने अपिल निकाली काढण्यात यावे; असे अपीलकर्ता श्री. विजयकुमार मोहनराव घाटगे यांचे दिनांक २४/२/२०१० चे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- ३१/३/२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री.अशोक गोविंद धारिया
परवीनअपार्टमेंट, फ्लॅट नं. १०४,
३/८, एरंडवणे, पुणे - ३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक धर्मादाय आयुक्त,
अहमदनगर विभाग,
अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती:-** श्री दत्त देवस्थान ट्रस्टच्या नोव्हेंबर २००७ च्या दरम्यान झालेल्या किर्तन महोत्सव व वैदिकांचा सत्कार या कार्यक्रमाच्या अनुषंगाने एकूण ९ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. अशोक गोविंद धारिया यांनी आयोगास सादर केलेल नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे- ४११००१

श्रीमती मीरा सर्जेराव शिंदे
सिध्दार्थ अपार्टमेंट, फ्लॅट नं. २१,
भारतीनगर, पौड रोड,
पुणे- ३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
अहमदनगर विभाग,
अहमदनगर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४१/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३/०२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती:-** श्री देवस्थान परिसरात प्रवेश करण्यासाठी एकूण दरवाजे, त्यांच्या दिशा व दरवाजातून प्रवेश देण्यासंदर्भात विश्वस्त मंडळाने केलेले ठराव व तदनुषंगिक एकूण १२ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्रीमती मीरा सर्जेराव शिंदे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती अश्विनी राजीव जोशी
बी २/७, शिवतारा गार्डन,
गणंजय सोसायटी, कोथरूड,
पुणे - ३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
अहमदनगर विभाग,
अहमदनगर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडीरस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४२/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४/०२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहितीः-** श्री दत्त देवस्थान ट्रस्ट, सावेडीच्या विश्वस्त मंडळावरील सचिव व सदस्य पदी नियुक्तीच्या / निवडीच्या अनुषंगाने एकूण १० मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्रीमती अश्विनी राजीव जोशी यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे- ४११००१

श्री. सुरेश सदाशिव आहेर
स.नं. ७९/१, फ्लॅट नं. ७,
श्री गणेश अपार्टमेंट, मोकाटेनगर,
डावी भुसारी कॉलनी, कोथरूड,
पुणे- ३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
अहमदनगर विभाग,
अहमदनगर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४३/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** सन २००० ते २००७ अखेरपर्यंत श्री दत्त देवस्थानातर्फे आयोजित करण्यात आलेले उत्सव व करण्यात आलेली कामे, त्यासाठी दिलेली देयके इ. च्या अनुषंगाने एकूण ११ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. सुरेश सदाशिव आहेर यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अभय ब्रम्हे
२, घरौदा अपाटमेंट,
स.नं. ७८/४-५, फ्लॅट नं. ६३,
डावी भुसारी कॉलनी, पौड रोड,
पुणे- ३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,
अहमदनगर विभाग,
अहमदनगर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४४/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४/०२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती:-** दि. ६ जुलै २००७ ते १४ जुलै २००७ या कालावधीत श्री दत्त देवस्थान ट्रस्ट यांच्यातर्फे झालेल्या कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रित म्हणून बोलविलेल्या व्यक्तींची, देवस्थानांची, देवदेवतांची यादी, सभेचे इतिवृत्त, ठराव, खर्च इ. अनुषंगाने एकूण ८ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. अभय ब्रम्हे यांनी आयोगास सादर केलेल नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ